# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक ५५

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १७/३/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. २३७०**

पुणे महानगरपालिका क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड, कोथरुड–बावधन या क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे फेब्रुवारी २०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्षेआप२/११८४ दि.६/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३७१**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी, कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांकडील दि. १/२/२०२० ते दि.२९/२/२०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे जा.क्र. समआ–४/६४७८ दि.११/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३७२**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोले पाटील रोड/येरवडा–कळस/नगर रोड (वडगांवशेरी) क्षेत्रिय कार्यालयाकडील माहे फेब्रुवारी २०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप–१/७७८३ दि.११/३/२०२० चे पत्र.

### मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. २३७३**

**मा.गणेश ढोरे यांचे दि.११/३/२०२० चे पत्र.**

फुरसुंगी देवाची उरूळी ग्रामस्थांनी केलेल्या उग्र आंदोलनाची दखल घेत राज्य प्रशासनाने पुणे शहरात व अन्य ठिकाणी कचरा प्रकल्पास जागा देण्याचे व फुरसुंगी देवाची उरूळी येथील कचरा डेपोची क्षमता कमी करत फुरसुंगी देवाची उरूळी येथील कचरा डेपो दि.३१.१२.२०१९ अखेर पूर्णपणे बंद करण्याचे आदेश पुणे महानगरपालिकेस दिलेले आहेत.

दुर्देवाने पुणे शहरात व अन्य ठिकाणी राज्य शासनाने देवू केलेली जागा कचरा डेपोसाठी ताब्यात घेण्यास महापालिकेने कोणतेही ठोस पाऊल उचलले नाही. सन २००६ पासून आजपर्यंत ३५ किमी व्यासाच्या पुणे शहरातील अवाढव्य कचरा या–ना त्या प्रकारे फुरसुंगी देवाची उरूळी येथील कचरा डेपोमध्ये टाकला जात आहे. सद्यस्थितीत दि.२७/२/२०२० रोजी मा.स्थायी समितीमध्ये २०० टन कचरा प्रकल्प करणेबाबत मे.भूमीग्रीन कंपनी यांना १५ वर्षे मुदतीकरिता विषय दाखल मान्य करण्यात आला आहे. सदर विषयाचा अन्वयार्थ पुणे मनपा अजून पुढील १५ वर्षे फुरसुंगी देवाची उरूळी येथील कचरा डेपो सुरू ठेवणार आहे असे स्पष्ट होत आहे. यासाठी १५ दिवसांपासून उरूळी फुरसुंगी कचरा डेपोवर स्थानिक ग्रामस्थांचे कचरा डेपो बंदचे आंदोलन चालू असताना सुध्दा स्थायी समितीने २०० टन कचरा प्रक्रियेचा विषय मान्य केला आहे. यामुळे सध्या चालू असलेले आंदोलन चिघळण्याची शक्यता असून,स्थानिक नागरिकांचा जास्त उद्रेक होऊ शकतो.

या विषयामुळे पंचक्रोशीतील नागरिकांच्या भावना प्रक्षुब्ध व परिसरातील वातावरण स्फोटक झालेले आहे. फुरसुंगी देवाची उरूळी येथील कचरा डेपोच्या जागेवर कोणताही प्रक्रिया अथवा विना प्रक्रिया स्वरूपाचा कचरा टाकू नये व कोणतेही नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण करून कचरा प्रकल्प राबवू नये. जिल्हयात अन्यत्र कचरा डेपोसाठी जागा शोधून त्याठिकाणी कचरा डेपो बनवावा. माझे प्रभागातील फुरसुंगी देवाची उरूळी येथे कोणत्याही परिस्थितीत कचरा टाकणेस समस्त ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांचा तीव्र विरोध आहे.

दि.३१.१२.२०१९ नंतर या डेपोवर कोणत्याही प्रकारचा कचरा ओपन डंप करू नये व नवीन कचराप्रकल्प राबविण्यात येऊ नये याबाबत हरीत लवाद कोर्टाचे आदेश व त्यावेळेस मनपाने सादर केलेले प्रतिज्ञापत्र दिलेले असताना सुध्दा दि.२७/२/२०२० रोजी झालेल्या मा.स्थायी समितीमध्ये २०० टन कचरा प्रकल्प करणेबाबत मे.भूमीग्रीन कंपनी यांना १५ वर्षे मुदतीकरिता विषय दाखल मान्य करण्यात आलेला आहे.

तरी सदर विषयाचा फेरविचार करून दप्तरी दाखल करण्यात यावा.

**विषय क्र. २३७४**

**मा.अरविंद शिंदे यांचे दि.१२/३/२०२० चे पत्र.**

पुणे शहरातील अनधिकृत व बेकायदेशीर जाहिरात फलकांबाबत गेल्या अनेक वर्षापासून विविध मा.सभासदांनी मुख्य सभेत स्थायी समिती व शहर सुधारणा समितीपुढे वारंवार तक्रारी, प्रश्नोत्तरे केलेली आहेत. मा.उच्च न्यायालयाने पुणे मनपा व अन्य स्थानिक स्वराज संस्थांना जाहिरात नियमावली २००३ चे पालन करून जाहिरात फलक परवानगी व नूतनीकरण देण्याचे स्पष्ट आदेश देवूनही शहरातील ८० टक्के जाहिरात फलक हे उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लघंन करणारे आहेत. पुणे शहराची प्रतिमा देशभरात होर्डिंग माफियांचे व अनधिकृत जाहिरात फलकांचे शहर अशी होत आहे. दि.१२/३/२०२० रोजीच्या स्थायी समिती कार्यपत्रिका क्र.५४ मध्ये सन २०१३ ते २०२० या कालावधीपासून मा.सभासद अरविंद शिंदे, मा.रफिक शेख, मा.राजश्री काळे, मा.चाँदबी नदाफ, मा.वैशाली मराठे, मा.प्रमोद ओसवाल, मा.योगेश ससाणे, मा.अविनाश बागवे, मा.मुकारी अलगुडे, मा.अभिजीत कदम, मा.सुनिता गलांडे, मा.प्रिया गदादे, मा.छाया मारणे व अन्य सभासदांनी विविध ठरावांद्वारे जाहिरात नियमावली व विकास नियंत्रण नियमावलीचे पालन करणेच्या हेतूने व न्यायालयीन आदेशाचे पालन होणे, बेकायेदशीर जाहिरात फलकावर कारवाई, महसूल प्राप्तीचे कारण दाखवून सामाईक व इमारतीच्या फ्रंट व साईड मार्जिनमध्ये प्रशासकीय आशीर्वादाने झालेले अतिक्रमण हटविणेसाठी स्थायी समितीपुढे ठराव दिलेले आहेत.

जवळपास सात वर्षापासून अभिप्राय देण्यास व ठोस कारवाई करण्यास महानगरपालिका प्रशासन अकार्यक्षम असल्याचे दुर्देवी चित्र निदर्शनास येत आहे. स्मार्ट सिटीकडे झेपावणा-या पुणे शहराचे वेगाने बकालीकरण अनधिकृत जाहिरात फलकांमुळे होत आहे. महापालिका प्रशासन व स्थायी समितीने तातडीने कार्यपत्रिका क्र.५४ मधील सर्व ठरावांचे अवलोकन करून तातडीने धडक कारवाई मोहीम राबवावी. सदर मोहीम मा.आयुक्त स्तरावरून राबविण्यात यावी.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. २३७५**

क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांकडील दि.१/२/२०२० ते २९/२/२०२० अखेर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्षेआप २/११८५ दि.६/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३७६**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि.१६/२/२०२० ते दि.२९/२/२०२० पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/११९० दि.११/३/२०२० चे पत्र.

**ठरावान्वये आलेले अभिप्राय**

**विषय क्र. २३७७**

पुणे शहरातील शिवछत्रपती पुरस्कार विजेत्यांना रोख रक्कम देऊन सन्मान करण्याकरिता र.रू.२,००,००,०००/– ची आवश्यकता आहे. मा.स्थायी समिती यांनी रक्कम उपलब्ध करून देण्याबाबत मा.विजय शेवाळे, अध्यक्ष क्रीडा समिती, मा.हरिदास चरवड,मा.बाळा उर्फ प्रमोद प्रेमचंद ओसवाल मा.अजय खेडेकर व मा.भैय्यासाहेब जाधव यांचे दि.२६/१२/२०१९ चे पत्रावर झालेला मा.क्रिडा समिती ठराव क्र. २९ दि.२६/१२/२०१९ ला अनुसरुन झालेला स्थायी समिती ठराव क्र. १९४५ दि.३१/१२/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/क्रीडा/११८६ दि.९/३/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. २३७८**

कात्रज ऊरूळी बायपास रस्त्याने बालाजी हॉटेल ते उंड्री चौक दरम्यान १० इंची व्यासाची मुख्य जलवाहिनी विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.नबिलाल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (स्थापत्य कामे र.रु.५२,१२,७५१/– (जी.एस.टी. वगळून) पेक्षा ०.१०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५२,०७,५३८=२५ पर्यंत अधिक प्रचलित दराने होणा–या वस्तु व सेवा कर र.रु.६,२४,९०४=५९ असे एकुण र.रु.५८,३२,४४२=८४ चे काम करुन घेण्यास व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/११७९ दि.६/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३७९**

पुणे महानगरपालिकेच्या डंपर प्लेसर या जुन्या वाहनाच्या चासीजवर मनपा स्पेसिफिकेशनप्रमाणे ८ क्यु.मी. क्षमतेची घंटागाडी बांधणी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आद्या एनव्हायरोमेंटल्स, पुणे यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९६,०१,०२०/– पेक्षा ॲटपार%) असल्याने त्यांचेकडून त्यांचे टेंडरदराने प्रती वाहन र.रु.३,२०,०३४/– याप्रमाणे एकूण ३० नग वाहनांसाठी र.रु. ९६,०१,०२०/– पर्यंत जीएसटी व सर्व करांसह करणेस व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/११८० दि. ०६/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३८०**

धनकवडी येथील राजमुद्रा सोसायटीलगत व गुलाबनगर चौकात नाल्यावर बॉक्स कल्व्हर्ट बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ए.आर.कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २,००,७५,१०१=०६ पेक्षा ६.७०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु १,८७,३०,०६९=२९ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये २४,०९,०१२=१३ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये १२,१८०/– पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटीशर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/११८१ दि. ०६/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३८१**

प्रभाग क्र. २ मध्ये टिंगरेनगर एअरपोर्ट रोडवर फुटपाथ व सायकल ट्रॅक विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.गणपत डी.ढमढेरे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८८,११,५३८/– पेक्षा २२.२०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६८,५५,३७६=५६ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,५७,३८४=५६ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू.१,०६,००५/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २५,०४६/– पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीतील डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/११८२ दि. ०६/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३८२**

प्रभाग क्र.४० क मध्ये आरक्षित जागेत स्मशानभूमी, दफनभूमी विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार आर.टी.दाते यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३६,४९,५२४/–पेक्षा १.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.३६,१३,०२८=७६ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.४,३७,९४२=८८ पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू.३८,९५६/– अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.९९,९२७=३८ पर्यंत अधिक अटीशर्तीनुसार सिमेंट,स्टील या विशेष भाववाढ(स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११८७, दि.९/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३८३**

प्रभाग क्र. ३२ ड मध्ये उद्यान विभागामार्फत विविध विकासाची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.ईश्वरी असोसिएट्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६३,८६,९०८=७५ पेक्षा ०.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ६३,२९,४२६=५७ पर्यंत काम करून घेणेस व त्यानुसारचा जी.एस.टी. र.रुपये ७,५९,५३१=१९ पर्यंत अदा करणेस अधिक अटी शर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार दरात होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसूल करणेस यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/११८८ दि.९/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३८४**

प्रभाग क्र.४० क मध्ये ॲमिनिटी स्पेसच्या जागेत बॅडमिंटन हॉल व स्पोर्ट लायब्ररी विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ध्रुवतारा एन्टरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,४२,३८७=४० पेक्षा ११.१६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.३५,०२,४१६=९६ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.४,७३,०८६=४९ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु. ८३,५३१=९४ पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू.३४,३७५/- पर्यंत अधिक अटीशर्तीनुसार सिमेंट,स्टील या विशेष भाववाढ(स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११९१, दि.११/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३८५**

प्रभाग क्र.४० क मध्ये सांस्कृतिक भवन व महिला बचत गटाकरीता हॉल उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ए.एस.वाणी ॲन्ड असोसीएटस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,९७,६५१=४० पेक्षा १०.८५०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.३५,६३,९०६=२२ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.४,७९,७१८=१७ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रु. ३२,५०८=२० पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू.४६,६७३/- पर्यंत अधिक अटीशर्तीनुसार सिमेंट,स्टील या विशेष भाववाढ(स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११९२, दि.११/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३८६**

प्रभाग क्र.३४ ब मधील हिंगणेखुर्द स.नं. १९ येथील खेळासाठी आरक्षित असलेल्या जागेवर क्रीडासंकुल उभारणे (फेज-१) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अमोल एन्टरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४०,०३,३८०/- पेक्षा ०.८९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.३९,६७,७४९=९१ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.४,८०,४०५=६० पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु. ५,३३,५५८=५० अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू.२२,९९८/- अधिक अटीशर्तीनुसार काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११९३, दि.११/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३८७**

प्रभाग क्र.२१ क स.नं. ६७ अ/३ अ घोरपडी गांव येथे ॲमिनिटी स्पेसमध्ये अग्निशामक केंद्र उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सचिन कांबळे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४४,०७,२२४/- पेक्षा १.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.४३,६३,१५१=७६ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.५,२८,८६६=८८ पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू.६३,१०५/- पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीनुसार सिमेंट,स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११९४, दि.११/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३८८**

प्रभाग क्र. २८ ब मध्ये स.नं. ४३८ येथील पुनावाला गार्डन शेजारी नव्याने विकसीत होणाऱ्या उद्यानामध्ये विविध विकस कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.दत्ता निवृत्ती मगर यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २६,६९,७६६=२० पेक्षा ७.२०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २४,७७,५४३=०३ पर्यंत काम करून घेणेस व त्यानुसारचा जी.एस.टी. र.रुपये २,९७,३०५=१६ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु. ३,५३३=५० व

टेस्टिंग चार्जेस र.रू.६,०९०/- पर्यंत अदा करणेस अधिक अटी शर्तीतील भाववाढ सुत्रानुसार दरात होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसूल करणेस यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/११९५ दि.११/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३८९**

प्रभाग क्र.४० आंबेगाव बु. येथील स.नं. ४३/१/१/२ मध्ये प्लेस मेकींग अंतर्गत विविध विकास कामे करणे (पार्ट-२) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आदित्य एन्टरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३८,२०,८६१=४० पेक्षा १.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.३७,८२,६५२=७८ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.४,५८,५०३=३७ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु. १३,४२७=३० मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू.४३,१०३/- पर्यंत अधिक अटीशर्तीनुसार सिमेंट,स्टील या विशेष भाववाढ(स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११९९, दि.१२/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३९०**

पुणे महानगरपालिकेच्या विविध मा.सभासदांच्या वॉर्डस्तरीय निधी मधून सन २०१९-२० करीता संगणक संच (संगणक, प्रिंटर व युपीएस) खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.यश कॉम्प्युटर सर्व्हिसेस, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रामध्ये नमुद कोष्टकानुसार र.रू.९४,०४,२२०/- (सर्व करांसह) पर्यंत खरेदी करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस तसेच त्यापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/भांडार/१२०१ दि.१२/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३९१**

लेक टाऊन सोसायटी जवळील अंबिल ओढयामध्ये मलवाहिनी टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.देवकर एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४४,५८,७२७=४० पेक्षा २५.०२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३,४३,१५३=८० व अधिक जी.एस.टी.र.रू.४,०१,१७८=४५ एकूण र.रुपये ३७,४४,३३२=२५ पर्यंत होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/१२०४ दि.१२/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३९२**

प्रभाग क्र. १ अ मध्ये विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोरेश्वर इलेक्ट्रीकल कॉर्पोरेशन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.४१,२६,९४८=६० पेक्षा २७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.३०,१२,६७२=४८ अधिक जी.एस.टी. १२% र.रू.३,६१,५२०=७० असे एकूण र.रु. ३३,७४,१९३=१८ पर्यंत काम करुन घेणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१२०५ दि.१२/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३९३**

सन २०१९-२० महापौर चषक अंतर्गत येणाऱ्या विविध क्रीडा स्पर्धासाठी मांडव व्यवस्था करणे (मनपा रजिस्ट्रेशन अट शिथील) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बालाजी मंडप डेकोरेटर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४४,२५,२००/- पेक्षा ०.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४३,८१,३९०=५२ पर्यंत अधिक जी.एस.टी.र.रू.५,३१,०२४/- पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार काम करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१२०६ दि.१२/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३९४**

आंबिल ओढयाने कडेने सिमाभिंत बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बारटक्के कंस्ट्रक्शन्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९३,७४,८०१=४३ पेक्षा १.०००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९२,८१,०५३=४२ व अधिक जी.एस.टी रक्कम रूपये ११,१३,७२६=४१ एकूण र.रू.१,०३,९४,७७९=८३ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणा-या एकूण रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांच्याशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/मलनि:/१२०७, दि.१२/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३९५**

पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट आंबेगाव बुद्रुक, स.नं. १५ व १६ येथे जलवाहिन्या विकसित करणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.नबीलाल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (स्थापत्य कामे र.रु.४४,६३,४७४=६० पेक्षा ८.२०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४०,९७,४६९=६८ पर्यंत अधिक प्रचलित दराने होणाऱ्या वस्तु व सेवा कर र.रुपये ४,९१,६९६=३६ असे एकूण र.रुपये ४५,८९,१६६=०४ चे काम करुन घेण्यास व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/१२०८, दि.१२/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३९६**

औंध क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत बाणेर बालेवाडी भागात व विविध ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.स्वामी समर्थ वॉटर सप्लायर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,९९,७८०/- पेक्षा १.०००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२९,६९,७८२=२०० पर्यंत काम करुन घेऊन त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पाणीपुरवठा/१२०९, दि.१२/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३९७**

समाज विकास विभागामार्फत प्रशिक्षण घेतलेल्या महिलांकरिता विविध प्रभागात शिलाई मशिन खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी सर्वात कमी दर देणारे ठेकेदार मे.नमन एंटरप्रायझेस, पुणे यांचेकडून मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रामध्ये नमुद कोष्टकानुसार र.रू.५८,७२,८००/- (सर्व करांसह) पर्यंत काम करुन घेणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस तसेच सदर कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/भांडार/१२१० दि.१२/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३९८**

हडपसर क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या विविध ठिकाणच्या नाल्यामधील अतिवृष्टीमुळे नादुरुस्त झालेल्या मुख्य मलवाहिन्यांची दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आर्यन कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५५,७०,२३५/- पेक्षा ३०.५३३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३८,६९,४७५=१५ व अधिक जी.एस.टी रक्कम रूपये ४,६४,३३७=०२ एकूण र.रू.४३,३३,८१२=१७ व विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणा-या एकूण रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांच्याशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/मलनि:/१२१२, दि.१२/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३९९**

प्रभाग क्र. ३९ परिसरातील रस्ते यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने कॉंक्रीटीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निखील एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४३,९९,८९८/- पेक्षा १५.१५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३७,३३,३१३=४५ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,२७,९८७=७६ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २१,२११/- अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु. ५०,८८२=४० पर्यंत अदा करणेस तसेच टेंडर अटीशर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१२१३ दि. १२/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २४००**

पुणे पेठ बिबवेवाडी येथील सीताराम आबाजी बिबवे शाळेमध्ये मॉडेल स्कूल प्रकल्पांतर्गत विविध विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.प्रतिक पवन मलजी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८३,७०,२२१=२८ पेक्षा १.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.८२,८६,५१९=०६ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.१०,०४,४२६=५५ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु. १,६२,५४१/- अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू.१,०८,७८६/- पर्यंत अधिक अटीशर्तीनुसार सिमेंट,स्टील या विशेष भाववाढ(स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१२१४ दि.१२/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २४०१**

प्रभाग क्र. २५ ब मध्ये कै.नामदेवराव शिवरकर दवाखान्यामध्ये डायलेसिस सेंटर उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार निलेश तरवडे कंन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४३,९६,८४१=२५ पेक्षा ०.४४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.४३,७७,४९५=१४ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.५,२७,६२०=९५ पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू.११,८६५/- पर्यंत अधिक अटीशर्तीनुसार सिमेंट,स्टील या विशेष भाववाढ(स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१२१५ दि.१२/३/२०२० चे पत्र.

**एकच टेंडर प्रकरणे**

**विषय क्र. २४०२**

प्रभाग क्र.३४ अ स.नं. १४३+१४४ कोथरुड येथे नवीन बालनाटयगृह येथे फायर फायटींगची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.ओंकार फायरवाईज प्रा.लि. यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.५९,२१,९५७/- पेक्षा ८.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.५४,४८,२००=४४ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रू.७,१०,७८६=०४ पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू.१,२६०/- पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ(स्टार रेट) सुत्रांनुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१२०३, दि.१२/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २४०३**

भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील दारुवाला पुल ते दुध भट्टी पुलापर्यंत नागझरी नाल्याच्या कडेने मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे कामी  टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.व्हि.जी.सोनवणे ॲन्ड कंपनी यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.४२,९१,६३८/- पेक्षा १.००% कमी) असल्याने त्यांचेकडून  र.रु.४२,४८,७२१=६२ पर्यंत अधिक जी.एस.टी.र.रू.५,०९,८४६=५९ असे एकूण र.रुपये ४७,५८,५६८=२१ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/१२११ दि.१२/३/२०२० चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. २४०४**

जाहिरात फलक संदर्भातील सर्व कामे परवाना व आकाशचिन्ह विभागामार्फत करून परवानगी व कारवाईचे सर्व अधिकार परवाना व आकाशचिन्ह विभागाचे प्रमुखांना देण्याबाबत मा.सौ.छाया मारणे यांचे दि. २४/१२/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १९४३ दि. ३१/१२/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/आकाशचिन्ह.पर./१०६० दि.७/२/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १७/२/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. २४०५**

सन २०१८-१९ महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा अंतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेच्या जादा झालेल्या खर्चाच्या खालील १ ते ४ बाबीस पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/क्रीडा/११८३ दि.६/३/२०२० चे पत्र.

१) महापौर चषक ज्युदो स्पर्धा सन २०१८-१९ या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना उर्वरित बक्षिसाची जादा रक्कम रु.२,५८,४००/- अदा करणेस,

२) महापौर चषक क्रिकेट स्पर्धा सन २०१८-१९ या स्पर्धेतील पंचांना पंच मानधनापोटी जादा रक्कम रु. २०,००/- अदा करणेस,

३) महापौर चषक कबड्डी स्पर्धा सन २०१८-१९ या स्पर्धेतील पंच मानधन, मैदान तयार करणे, प्रवास भत्ता पोटी जादा रक्कम रु. २,५५,५००/- अदा करणेस,

४) महापौर चषक विविध क्रिडा स्पर्धा सन २०१८-१९ साठी व्हिडीओ चित्रीकरण/फोटोग्राफीचे काम करणारे मे.टाईम्स व्हीजन यांना उर्वरित जादा बिल रक्कम रु. ६,५६,६७०/- अदा करणेस

**विषय क्र. २४०६**

मे.औद्योगिक न्यायालय, पुणे आणि मे.उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशाचे पालन करणेसाठी तक्रारदार माजी सैनिकांच्या बहुउद्देशिय पथकात सुपरवायझर व सहाय्यक या अस्थायी पदावर सहा महिनेसाठी करार पध्दतीने सेवा घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सुरक्षा/११९६ दि.११/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २४०७**

पुणे महानगरपालिकेच्या मोटार वाहन विभागाकडील ११ - यांत्रिकी, ग- मोटार विभाग या अंदाजपत्रकीय शिर्षकावरील ४क-ठेकेदारी पध्दतीने घेण्यात येणाऱ्या मोटार सारथी/तांत्रिक सेवकांचे वेतन, ६-स्वच्छता व दुरुस्ती या कामी खालीलप्रमाणे र.रु. २९० लक्ष वर्गीकरणाने तरतूद उपलब्ध करुन देण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/१२०२ दि.१२/३/२०२० चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, मोटार वाहन विभाग, ७- यंत्रसामुग्री व घसरा निधीतुन विकत घ्यावयाची सामग्री | | |
| १) वॉटर टँकर पंपासह FE17A103 – 1 | २०० लाख | --- |
| २) फायर इंजिन गाडी FE17A103 – 2 | ७ लाख | --- |
| ३) रेस्क्यू इक्वीपमेंट व लाईट मास्ट FE17A103- 12 | ८३ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| मोटार वाहन विभाग, | | |
| १) ठेकेदारी पध्दतीने घेण्यात येणाऱ्या मोटार सारथी/तांत्रिक सेवकांचे वेतन RE 21 C 104 B | --- | २५० लाख |
| २) स्वच्छता व दुरुस्ती RE 21 C 106 | --- | ४० लाख |

**विषय क्र. २४०८**

ऑडीट उपसमितीची नियुक्ती करुन मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र.६६९२ दि. ११/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २४०९**

अपिल उपसमितीची नियुक्ती करुन मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र.६६९३ दि. ११/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २४१०**

पुणे महानगरपालिका प्रभाग क्र.४० मधील कात्रज डेअरी सर्व्हे नं. १३० ते १३३ कात्रज पुणे महानगरपालिकेच्या विकास आराखडयामध्ये दक्षिण-उत्तर १२ मी. (सुधारीत नकाशानुसार २४ मी.)डी.पी रस्त्याचे नियोजन आहे.सदरची जागा ही कात्रज दुध संघाच्या मालकीची आहे. संघातर्फे या रस्त्यास ना हरकत आहे. परंतु त्यांच्या काही मागण्या त्यांनी पुणे मनपा प्रशासनास केल्या आहेत. त्या बदल्यात ते पुणे मनपाला रस्ता रूंदीकरणासाठी जागा उपलब्ध करून देण्यात तयार आहेत.

भारती विद्यापीठ येथील अरूंद रस्त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येमुळे भारती विद्यापीठ नेहमीच वाहतूक कोंडी होवून लहान-मोठे अपघात घडत आहेत. वर्षानुवर्षे प्रलंबित असलेली समस्या मार्गी लागल्यास वाहतूक सुस्थितीत होईल.

तरी वरील विषय विचारात घेता वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी सदरचा डीपी रस्ता होणे गरजेचे आहे. या रस्त्याच्या विकासासाठी निधीची तरतूद उपलब्ध करून रस्ता निर्माण करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.युवराज बेलदरे व मा.अमोल बालवडकर, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती यांचे दि.१४/२/२०२० चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. २८७ दि.१४/२/२०२० विचारासाठी.

**विषय क्र. २४११**

पुणे महानगरपालिका प्रभाग क्र.४० मधील सर्व्हे क्र.१२७ चंद्रभागानगर, कात्रज-४११०४६ (कात्रज जुनी हद्द) येथील मनपा शाळा क्र.१६२ व विद्यानिकेतन क्र.१९ या शाळांच्या इमारती समोर प्रशस्त मैदान असून अनेक वर्षापासून हे मैदान विकासापासून वंचित आहे. त्याप्रमाणेच या मैदानाच्या मधूनच रहीवाशी सोसायटीसाठी येण्या-जाण्यासाठी रस्ता आहे. या रस्त्यामुळे मैदान दोन्ही बाजूस विखुरले आहे. यामुळे दुस-या मैदानाची जागा पडीक आहे.सुरक्षाभिंत गेट नसल्याने तसेच मुख्य रस्त्याला लागूनच असल्याने या मैदानाच्या जागेवरती नागरिकांकडून कचरा टाकला जातो.

सदरचे मैदान एकत्र करून सोसायटी मधील रहिवाश्यांना मैदानाच्या एका बाजूने पर्यायी त्याच रूंदीचा रस्ता मुख्य रस्त्यास काढून देता येईल. यासाठी सोसायटीमधील रहिवाश्यांची ना हरकत आहे. मैदान एकत्र करून पुणे महानगरपालिकेच्या सणस मैदानाच्या धर्तीवर प्रशस्त अश्या मैदानाची निर्मिती करता येईल. या मैदानाचा उपयोग शाळेतील विद्यार्थ्यांसहित परीसरातील आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य जिल्हास्तरावरील खेळाडूंना करता येईल. त्याप्रमाणेच भविष्यात या मैदानावर्तीच नविन खेळाडू तयार होतील.

स्मार्ट सिटीला धरून पाहता, आजच्या परिस्थितीला पुणे शहरामध्ये प्रशस्थ मैदानांची वाणवा पाहायला मिळत आहे.शहरभरातील खेळाडूंना मध्यवर्ती सणस मैदान, नेहरू स्टेडियम या ठिकाणी येऊन सराव, प्रशिक्षण घ्यावे लागते.उपनगराची वाढती लोकसंख्या पाहता त्याप्रमाणेच येत्या काळात नव्याने महानगरपालिकेमध्ये समाविष्ट होणारी गावे प्रभाग क्र.४० हद्दीला लागूनच आहेत. यामुळे या परिसरातील नागरिकांना सुध्दा याचा फायदा होईल.

तरी वरील विषय विचारात घेता उपनगरामध्ये नविन मैदानाची आवश्यकता आहे. यासाठी शिक्षण मंडळाच्या ताब्यातील या जागेवरती प्रशस्त मैदानाच्या निर्मितीला हे दोन्ही मैदाने एकत्र करून मैदानाच्या विकासासाठी तरतूद उपलब्ध करून द्यावी आणि रहिवाशी सोसायटीस पर्यायी रस्ता तयार करून देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.युवराज बेलदरे व मा.अमोल बालवडकर, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती यांचे दि.१४/२/२०२० चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. २८८ दि.१४/२/२०२० विचारासाठी.

**विषय क्र. २४१२**

सन २०१९-२०२० च्या अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार घोले रोड, शिवाजीनगर येथील मामाराव दाते मुद्रणालय , J (जे) प्लॉट येथील इमारत तळमजला अधिक एक मजला अशी २२४३.८७ चौ.मी. क्षेत्रफळाची इमारत धोकादायक बनलेली असल्यामुळे सदर धोकादायक इमारतीचे बांधकाम मालमत्ता निर्लेखित (Write off) करणेस व सदर धोकादायक इमारतीचे संपुर्ण बांधकाम पाडून तेथे नव्याने सिटी लायब्ररी उभारण्यात यावी व मुद्रणालयासाठी नव्याने इमारत तेथे अथवा अन्य ठिकाणी बांधण्यास मान्यता मिळणेबाबत मा.प्रा.सौ.ज्योत्स्ना गजानन एकबोटे यांचे दि.२४/२/२०२० चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. ३०३ दि.२८/२/२०२० विचारासाठी.

**विषय क्र. २४१३**

पुणे महानगर परिवहन महामंडळास सन २०१८-१९ या वर्षात वितरीत केलेल्या मोफत/ सवलतीचे बसपासपोटी PMPML संस्थेस र.रु.२२,८८,०९,२३५/- अदा करणेस, तसेच यापुर्वीच उचल स्वरुपात आदा करण्यात आलेले रक्कम रु.२० कोटी समायोजित करुन उर्वरीत र.रु.२,८८,०९,२३५/- PMPML संस्थेस RE58A101B या अर्थशिर्षकातून आदा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/१२१६ दि.१२/३/२०२० चे पत्र.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**